N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** मालेगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0403 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/08/2023 23:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 23/08/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/08/2023
**Time From (वेळेपासून):** 15:03 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:14 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/08/2023 **Time (वेळ):** 22:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 043
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/08/2023 22:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्या, मालेगाव,मालेगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.अशोक भिमराव पवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1974

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामनगर,तामालेगांव ,मालेगांव ,मालेगाव,मालेगांव,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रामनगर,तामालेगांव ,मालेगांव ,मालेगाव,मालेगांव,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7028182795

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संगीता माधवराव काकडे | | | 1. एरिगेशन कलनी, सिव्हील लाईन ,वाशिम,वाशिम,वाशिम,वाशिम, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सौ.संध्या शंकरराव सराटे | | | 1. रारामनगर शेलु रोड मालेगांव, मालेगाव,मालेगाव,मालेगांव, वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 100 रू दराचे 3 नोटा | 300.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

300.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पो.स्टे.मालेगांव
दिनांक:- 23.08.2023

नांव- श्री.अशोक भिमराव पवार वय 49 वर्षे,व्यवसाय शेती,रा,रामनगर,ता.मालेगांव जि.वाशिम,
मो.नं. 7028182795

वरील ठिकाणी कुटूंबासह राहतो. माझे कडे रामनगर येथे वडीलोपार्जित व स्वतःचे नावाने अशी एकुण 7 एकर शेती असुन शेती करतो. दिनांक 23.08.2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम कार्यालयात जावून पोलीस उपअधिक्षक गजानन आर.शेळके यांचेकडे तक्रार सांगीतली. पोलीस उपअधिक्षक गजानन आर.शेळके यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती वाशिम यांना पत्र देऊन दोन पंच प्राप्त केले. दोन पंचासमक्ष तक्रार दिली ती खालील प्रमाणे.
आमची शेती मौजे रामनगर गट नं.35,22,38,41 मध्ये आहे तसेच आमचे नातेवाईक यांची शेती गट नं. 5,28,26,15 मध्ये आहे.सदर शेतीत सोयाबिन,तुर पेरली होती. सदर शेती ही जंगल परीसराला लागुन तसेच काही अंतरावर आहेत. मागील आठवडयात रोही व हरणे या जनावरांनी सदर गटामधील पिके खावुन नुकसान केले आहे. सदर पिकाची नुकसान भरपाई वनविभागाकडुन मिळते त्याकरीता वनविभागाकडे आवष्यक कागदपत्रासह अर्ज करावा लागतो. त्यामुळे मी वरील गट नं मधील शेतांची चतुर्सिमा नकाशा मिळणेकरीता भुमिअभिलेख कार्यालय मालेगांव येथे दिनांक 22.08.2023 रोजी जावुन वरील गट नं.मधील शेतांची चतुर्सिमा नकाशा मिळणेकरीता अर्ज, कार्यालयातील बाबु श्रीमती काकडे मॅडम यांना दिला तसेच शेतांची चतुर्सिमा नकाशा मिळणेकरीता आवष्यक असलेले शासकिय फि 160/-रु आनलाईन चलानव्दारे भरलेली आहे.सदर चलानची एक प्रत कार्यालयात दिली. त्यांनी शेतांची चतुर्सिमा नकाशे आज दि.23.08.2023 रोजी देतो असे सांगून प्रत्येक शेतांची चतुर्सिमा नकाशा करीता 100/-रु या प्रमाणे श्रीमती काकडे मॅडम यांनी मला वरील 8 गटाचे एकुण 800/-रु लाचेची मागणी केली आहे. सदरचे पैसे हे सराटे परीचारक यांचे कडे देवुन नकाशा घेवुन जाण्यास सांगीतले.शेतांची चतुर्सिमा नकाशा मिळणेकरीता आवष्यक असलेले शासकिय फि 160/-रु आनलाईन चलानव्दारे भरलेली आहे. तरीही देखील शेतातील पिकांचे नुकसान झाले असल्यामुळे नुकसान भरपाई मिळण्याकरीता शेतांची चतुर्सिमा नकाशाची आवष्यकता असल्यामुळे मी श्रीमती काकडे मॅडम यांना 800/-रु देण्याचे नाईलाजास्तव कबुल केले आहे. माझी श्रीमती काकडे मॅडम व श्रीमती सराटे परीचारक भुमि अभिलेख कार्यालय मालेगांव यांना पैसे देण्याची इच्छा नाही. श्रीमती काकडे मॅडम व श्रीमती सराटे परीचारक भुमि अभिलेख कार्यालय मालेगांव यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुश्मनी नाही. श्रीमती काकडे मॅडम व श्रीमती सराटे परीचारक भुमि अभिलेख कार्यालय मालेगांव यांच्यावर कारवाही करावी या करीता तक्रार देत आहे. कारवाही होण्यास विनंती आहे. वरील प्रमाणे तक्रार हस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर मी,पंच व पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी वाचुन सही केली.
श्रीमती काकडे मॅडम व श्रीमती सराटे भुमि अभिलेख कार्यालय मालेगांव यांची भेट घेवुन तक्रारीवरुन दि. 23.08.2023 रोजी पडताळणी करणे असल्याने पोउपअधिक्षक शेळके, दोन्ही पंच, स्टाफ व मी असे मालेगांव

येथे गेलो. तिथे माझी भुमी अभिलेख कार्यालयात मालेगांव येथे श्रीमती सराटे मॅडम यांचेसोबत भेट होवून बोलनी झाली. दरम्यान मी श्रीमती सराटे याना झालेका दाखले आपले असे म्हटले असता त्यांनी मला दुपारी या असे म्हटले. मी त्यांना तिन वाजता असे म्हटले. श्रीमती सराटे यांनी मला चार वाजता या असे म्हटले. मी श्रीमती सराटे यांना अं बर किती दया लागतात असे म्हटले. श्रीमती सराटे यांनी मला दयानं असे म्हटले. मी श्रीमती सराटे यांना दोनशे देलते असे म्हटले. श्रीमती सराटे यांनी मला अजुन दोन तिन दया असे म्हटले. मी श्रीमती सराटे यांना दोनशे तिनशे पाचशे होतात नं सगळे असे म्हटले असता श्रीमती सराटे यांनी मला नाही आठशे होतात असे म्हटले. मी श्रीमती सराटे यांना आठशे होतात आठशे मधुन किती दयायचे असे म्हटले. श्रीमती सराटे यांनी मला अजुन दोन दया करुन टाकते असे म्हटले. मी श्रीमती सराटे याना दोनशे... काकडे मॅडम .. काकडे मॅडम कुठ गेल्या असे म्हटले. श्रीमती सराटे यानी मला हो देउन टाका नं त्याहलेच देउन टाका.. सगळे देते ना असे म्हटले. मी त्यांना बनवा मी सात बारे अन ते घेउन येतो असे म्हणुन श्रीमती सराटे यांनी मला आमचे शेताची चतुर्सिमा नकाशा देण्याकरीता श्रीमती काकडे यांचे करीता स्वतःचा प्रभाव टाकुन 800/-रु ची लाचेची मागणी करुन पुर्वी 200/-रु स्विकारल्याचे मान्य करुन तडतोडअंती अजुन 300/-रु स्विकारण्याची तयारी दर्शवुन लाचेची रक्कम 300/-रु काकडे मॅडम यांचे कडे देण्याचे सांगीतले. श्रीमती सराटे यांनी लाचेची रक्कम घेवुन तीन वाजता दरम्यान बोलाविले असल्याने सापळा कारवाई लगेच करण्याचे पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी सांगीतले. पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी मला, श्रीमती सराटे किंवा काकडे मॅडम यांना लाच म्हणुन देण्याकरीता 300/-रूपये रक्कम हजर करण्यास सांगितले असता मी 100/-रूपये दराची 3 नोटा असे एकुण 300/-रूपये हजर केले.

काकडे मॅडम यांना लाच म्हणुन दयावयाचे रकमेस अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी सापळा कार्यवाही संबंधी सुचना दिल्या. अँल्ट्राव्हायोलेट लॅम्पचा प्रयोग करून दाखविले. भुमि अभिलेख कार्यालय मालेगांव येथे पंचासमक्ष सापळा कारवाई आयोजीत करण्यात आले. माझी श्रीमती सराटे व श्रीमती काकडे यांचे सोबत भेटून बोलनी झाली. तेव्हा मी श्रीमती काकडे यांना काकडे मॅडम झाले का आमचे नकाशे असे म्हटले असता श्रीमती सराटे यांनी मला पावती असे म्हटले. मी त्यांना पावती मंघा देली नं तुम्हाले...नाही देली असे म्हटले. श्रीमती काकडे यांनी मला तेवीस एकोनपन्नास हाये का किती हे नंबर तुमचा असे म्हटले.मी श्रीमती काकडे यांना मॅडमनं घेतलीनं पावती असे म्हटले. श्रीमती सराटे यांनी मला देउन दया असे म्हटले. मी श्रीमती सराटे यांना पैसे देउन देउ.. किती देउ असे म्हटले. श्रीमती सराटे यांनी मला दया नं हजारक रुपये असे म्हटले. मी श्रीमती काकडे यांना काकडे मॅडम असे म्हटले असता त्यांनी मला हं असे म्हटले.मी त्यांना हजारक रुपये असे म्हटले असता श्रीमती सराटे यांनी हजार असे म्हटले.त्यावर श्रीमती काकडे यांनी मला सांगीतले न मॅडमने दया असे म्हटले. त्यावर मी श्रीमती काकडे यांना मॅडमनं दोनशे तिनशे सांगीतले दोनशे देउ की तिनशे देउ असे म्हटले. श्रीमती काकडे यांनी मला तुम्हालं जेवढे दयायचे तेव्हढे दया बरं असे म्हटले. मी श्रीमती काकडे यांचे समोर लाचेची रक्कम 300/-रु धरुन घ्या असे म्हटले असता श्रीमती काकडे यांनी मला किती हायेत ते असे म्हटले. मी श्रीमती काकडे यांना तिनशे असे म्हटले. श्रीमती काकडे यांनी मला बर असे म्हटले. मी त्यांना कालं दोनशे देलतेनं असे म्हटले असता श्रीमती काकडे यांनी ठिक आहे दया असे म्हटले. त्यांनतर मी लाचेची रक्कम श्रीमती काकडे बसलेल्या टेबलवर असलेला कागदावर ठेवली असता श्रीमती काकडे यांनी सदर लाचेची रक्कम कागदासह उचलुन टेबलचा ड्राव्हर उघडुन ड्राव्हर मध्ये टाकली. श्रीमती काकडे यांनी माझेकडुन लाच रक्कम स्विकारल्याचा मी सापळा पथकास पुर्व नियोजित इशारा केला.पोलीस उपअधिक्षक शेळके यांनी महीला पंच व महिला कर्मचारी यांचे मदतीने श्रीमती काकडे व श्रीमती सराटे यांना 300/-रु लाच रकमेसह ताब्यात घेतले.

दि.23.08.2023 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान सौ.संध्या शंकरराव सराटे वय 59 वर्षे दप्तरबंद, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय मालेगांव रा.रामनगर शेलु रोड मालेगांव जि.वाशिम यांनी शेतीचा चतुर्सिमा नकाशा देण्याकरीता श्रीमती काकडे यांचे करीता स्वतःचा प्रभाव टाकुन 800/-रु ची लाचेची मागणी करुन पुर्वी 200/-रु स्विकारल्याचे मान्य करुन तडतोडअंती अजुन 300/-रु स्विकारण्याची तयारी दर्शवुन लाचेची रक्कम 300/-रु श्रीमती काकडे यांचे कडे देण्याचे सांगीतले. दि.23.08.2023 रोजी 15.03 ते 15.14 वा दरम्यान सापळा कारवाई दरम्यान संगीता माधवराव काकडे वय 46 कनिष्ठ लिपीक अतिप्रभार प्रतिलिपीक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय मालेगांव रा.एरिगेशन कॉलनी, सिव्हील लाईन वाशिम यांनी लाचेची मागणी करुन लाच रक्कम 300/-रु स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद पो.हवा विनोद मारकंडे यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचून पाहली, माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष सही

(गजानन आर.शेळके) ( अशोक भिमराव पवार )
पोलीस उपअधिक्षक, रा.रामनगर,ता.मालेगांव जि.वाशिम,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
RAVI NARAYAN SAIBEWAR
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): 642
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)
ठाणे अमलदार
पो.स्टे. मालेगांव जि.वाशिम

**Name** (नाव): DATTATRAY KONDU
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):